**OFFICE OF THE SUPDT. OF POLICE JALGAON**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव**
**Office Ph -0257-2220411 Fax - 0257-2220511**
**Email ID - sp.jalgaon@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट :-** **दिनांक -२९/०८/२०२५**

---

प्रति,

संपादक,
दैनिक----------------

विषय :- स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांनी अवैधरीत्या अंमली पदार्थ गांजा विक्री करण्याचे उद्देशाने बाळगुन असलेल्या इसमांवर एनडीपीएस अॅक्ट अन्वये कारवाई करुन ०२ आरोपी अटक करुन १९४३४०/- रु चा मुद्देमाल हस्तगत केले बाबत.

दि.२८/०८/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव येथील पोउपनि/शरद बागल, पोहेकॉ/प्रविण भालेराव, पोहेकॉ/मुरलीधर धनगर, पोकॉ/सिध्देश्वर डापकर, पोकॉ गोपाल पाटील, चा.पोकॉ/महेश सोमवंशी असे शासकिय वाहनाने गणेश उत्सवाचे अनुषंगाने फैजपुर उपविभागात गस्त घालीत असतांना पथकातील अधिकारी व अंमलदार यांना गोपनिय बातमी दारामार्फत बातमी मिळाली की, फैजपुर पो.स्टे. हद्दीत न्हावी शेतशिवारातील शेतात असलेल्या पत्र्याचे घरात एक ईसम हा त्याचे जवळ अवैधरीत्या अंमली पदार्थ गांजा हा विक्री करण्याचे उद्देशाने स्वत: जवळ बाळगुन असल्याबाबत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली.

सदरची माहिती ही मा. वरिष्ट पोलीस निरीक्षक, श्री संदीप पाटील सो. यांना देवुन त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे सदर पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी फैजपुर पो.स्टे. येथे जावुन प्रभारी अधिकारी फैजपुर पो.स्टे. श्री सपोनि रामेश्वर मोताळे व पो.स्टे. नेमणुकीचे पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच श्री रंगनाथ धारबळे, पोलीस निरीक्षक, यावल पो.स्टे. यांचे मदतीने एनडीपीएस अॅक्ट अन्वये सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन पो.स्टाफ व शासकिय पंच यांचे सह जावुन छापा कारवाई केली असता न्हावी गावातुन जानोरी गावाकडे जाणारे रस्त्याचे लगत असलेल्या किशोर भागवत पाटील रा. न्हावी ता. यावल जि. जळगांव यांचे शेतात पत्र्याचे घरामध्ये आरोपी नामे १)रगन सुकराम बारेला वय ३२ वर्ष रा. महादेव शिरवेल, ता. भगवानपुरा जि. खरगोन (मध्यप्रदेश) ह.मु. किशोर भागवत पाटील याचे न्हावी गावातुन जानोरी गावाकडे जाणारे रस्त्याचे लगत असलेल्या शेतातील पत्र्याचे घरात २) अझरुद्दीन अब्दुल वाहिद कुरेशी वय २७ वर्ष रा. सिध्दबलपुर, एलहंका, बेंगलुरु अर्बन (कर्नाटक) हे अवैधरीत्या ९ किलो ७१७ ग्रॅम अंमली पदार्थ गांजा किंमत १,९४३४०/- रु किं.चा विक्री करण्याचे उद्देशाने स्वत:जवळ बाळगुन असतांना मिळुन आल्याने त्यांचेजवळुन जप्त करण्यात आला असुन नमुद दोन्ही आरोपी यांचे विरुध्द फैजपुर पो.स्टे. येथे एनडीपीएस अॅक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक सो., जळगांव, डॉ महेश्वर रेड्डी, मा. अपर पोलीस अधीक्षक, श्री अशोक नखाते, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी,फैजपुर उपविभाग, श्री अनिल बडगुजर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री संदीप पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. रंगनाथ धारबळे, यावल पो.स्टे. यांचे संपुर्ण उपस्थितीमध्ये सपोनि./रामेश्वर मोताळे, प्रभारी अधिकारी, फैजपुर पो.स्टे. पोउपनि. शरद बागल, स्थागुशा, जळगांव, पोउपनि. निरज बोकील, पोउपनि. विनोद गाभणे फैजपुर पो.स्टे., पोहेकॉ/प्रविण भालेराव,पोहेकॉ/मुरलीधर धनगर, पोकॉ/सिध्देश्वर डापकर, पोकॉ/गोपाल पाटील, चापोकॉ/महेश सोमवंशी सर्व स्थागुशा, जळगांव तसेच सफौ/देविदास सुरदास,पोहेकॉ/देवेंद्र पाटील,पोहेकॉ/विकास सोनवणे,पोकॉ/ भुषण टाकरे सर्व फैजपुर पो.स्टे. यांनी संयुक्तीकरित्या केली आहे.

जनसंपर्क अधिकारी,
जळगांव जिल्हा पोलीस


प्रभारी अधिकारी कक्ष
vivo X200 | ZEISS
08/29/2025, 00:53


vivo X200 | ZEISS
08/28/2025, 23:49